# एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ,शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

## अराजपत्रित कर्मचाऱ्यांसाठी मराठी भाषा निम्नस्तर परीक्षा

## प्रश्नपत्रिका एक — विहित पाठ्यपुस्तक व कार्यरूप व्याकरण

दिनांक : ३० डिसेंबर, २०१८

[ वेळ : सकाळी १०.३० ते दुपारी १.१५ ]

**( तोंडी परीक्षेस लागणारा वेळ धरून )**

**(एकूण गुण: १००)**

---

सूचना :- (१) नवीन प्रश्न नवीन पानावर सोडवावा.
(२) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.
(३) प्रश्नासमोर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा पूर्ण गुण दिले जाणार नाहीत.
(४) प्रश्नपत्रिकेवर कोणत्याही प्रकारचे लेखन करण्यात येऊ नये.

**गुण**

**प्रश्न क्र.१** पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा. **१०**

'सजीवांसाठी जीवनदायी केंद्र' अशी त्या लिंबाच्या झाडाची व्याख्या झाल्याचं माझ्या लक्षात आलं; पण इतकचं नव्हे तर, माणसंही त्या झाडाकडं आकर्षित होत होती.

ज्या कुण्या दाक्षिणात्य स्त्रीनं हे लिंबाचे झाड राहत्या घराच्या मागं केवळ भाडेकरू असताना लावलं होतं, तिनं त्या झाडाला कुंपण घातलं नव्हतं. मुक्त-मोकळं झाड तिनं जणू कडूपणाच्या आणि कंजुषीच्या मर्यादा घातलेल्या नव्हत्या. आसपासचे लोक येत, लिंबाची फळं मुक्तपणे घेऊन जात. फळ कधी कमी पडली नाहीत, फळांनी लगडलेलं ते झाड दृष्ट लागण्यासारख, समृद्धीची भावना जागवणारं आणि जीवनदायी होतं... सगळ्यांसाठीच !

म्हणजे असं की, माणसं, पशु-पक्षी, कीटक, साप, कुत्री आणि खारी, गोगलगाई अशा सगळ्यांनाच ते आकर्षून घेत असे. भोवतालच्या काहिलीतलं विसाव्याचं आणि आनंदाचं जणू आशीर्वादमय आश्वासन आणि जगण्याचा दिलासा........

इतकं महत्त्व त्या झाडाला आलेलं पाहून मी चकित होऊन गेलो होतो. ज्या घराची हकीकत मी सांगतो आहे, ती एक जोड इमारत होती. ट्विन ब्लॉक. शेजारी जे राहत होते, त्यांच्या परसदारी चक्क पाण्याचा हापसा होता म्हणजेच भरपूर पाणी होते. मात्र अंगणात आणि परसदारात गवताची काडीही नव्हती. माणसं उदास, दुर्मुखलेली, त्रस्त वाटत. त्या घरातीज स्त्री नेहमी दागिने घालून बसे; परंतु पाणी आणि जमीन मुबलक असतानाही त्यांनी हिरवा आनंद पसरवण्याचा प्रयत्न कधी केला नाही. मला वाटतं झाड लावणं, ते जगवणं, त्याद्वारे दूरवर आनंदाचे आणि आश्वासनाचे संगीतमय संदेश पसरवण आणि सर्व सजीवांचे आशीर्वाद घेणं ही एक प्रवृत्तीच असावी लागते. जो माणूस एखादं झाड जगवतो, तो निसर्गात एक 'हिरवा चमत्कार' रूजवत असतो. हे लिंबाचं झाडच बघा ना ! ज्या कुण्या बाईनं हे झाड लावलं होतं, ती बाई इथून निघून गेली होती; परंतु जाताना एक अद्भुत नाट्य ती आपल्या मागं ठेवून गेली. दरवर्षी, दर ऋतूत त्या झाडाच्या अनुषंगानं एक उत्सव साजरा

गुण

होत असणारं, फुल येत असणारं, घमघमाट दरवळत असणारं आणि मग एक आख्खा फलोत्सव... फळांचं लगडणं... हे सगळं घडत असणार, मी तर केवळ एका ऋतूतला सजीवांच्या जागत्या नांदत्या अस्तित्वाचा साक्षीदार होतो; पण शेजारची ती माणसं ? ती अनेक वर्ष त्या घरात राहत आलेली होती; परंतु न त्यांनी ते 'हिरव कौतुक' पाहिलं, न त्यांनी झाडं लावली, न त्यांनी फुल फुलवली. हा निसर्गातला आनंद त्यांच्या मनात कधी पोचल्याचं मी पाहिलंच नाही. म्हणूनच कदाचित ती माणसं त्यांच्या परस-अंगणासारखीच उदास, भकास, तपकिरी अशीच वाटत राहिली मनानं.

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :-**

अ) लिंबाच्या झाडाची कोणती व्याख्या झाली ?

ब) जीवनदायी झाड कोणते ? व त्याचे वर्णन करा.

क) लिंबाचे झाड कोणा – कोणाला आकर्षून घेत होते ?

ड) निसर्गातील हिरवा चमत्कार कोणता ?

इ) एका ऋतुतल्या कोणत्या जागत्या नांदत्या अस्तित्वाचा साक्षीदार लेखक होते ?

**प्रश्न क्र.२** **(अ)** पुढीलपैकी कोणत्याही **पाच** वाक्प्रचारांचे अर्थ लिहून त्याचा अर्थपूर्ण वाक्यात उपयोग करा. **१०**

(१) पाठबळ असणे

(२) धक्का बसणे

(३) पाहुणचार करणे

(४) रक्ताचे पाणी करणे

(५) आनंद गगनात न मावणे

(६) ब्रम्हांड कोसळणे

**(ब)** गट 'एक' मधील शब्दांची गट 'दोन' मधील समानार्थी शब्दांबरोबर जुळणी करा **१०**

| **गट 'एक'** | **गट 'दोन'** |
|---|---|
| (१) संवेदना | (अ) उत्तम |
| (२) उत्कृष्ट | (ब) डोळा |
| (३) रहस्य | (क) फूल |
| (४) दिवस | (ड) जाणीव |
| (५) नयन | (इ) कल्पना |
| (६) पताका | (फ) इनाम |
| (७) सुमन | (ग) दिन |
| (८) तपास | (ह) निशाण |
| (९) बक्षीस | (य) चौकशी |
| (१०) युक्ती | (र) गुपित |

**प्रश्न क्र.३** पाठ्यपुस्तकाच्या पाठाच्या आधारे पुढीलपैकी **पाच** प्रश्नांची पाच ते सहा ओळीत उत्तरे लिहा. **गुण २०**

(अ) स्वातंत्र्य पूर्व काळात भारतीयांवर असलेल्या अंधश्रद्धांच्या प्रभावासंबंधी विचार स्पष्ट करा.

(ब) 'काझीरंगा कर्दमभूमी आहे' हे विधान सोदाहरण सांगा.

(क) 'बदलत्या गावगाड्यात आजीला जागाच उरली नाही' या विधानाबाबत तुमचे मत सविस्तर लिहा.

(ड) 'ऑलिंपिक म्हणजे विश्वबंधुत्व' ही संकल्पना स्पष्ट करा.

(इ) लेखक शंकरराव खरात यांनी हेडमास्तरांचे वर्णन कसे केले आहे ?

(फ) हेलन केलर आयुष्यात पहिल्यांदा 'उद्याची' वाट का पहात असेल ?

**प्रश्न क्र.४** 'दिव्याच्या शोधा मागचे दिव्य' पाठाच्या आधारे पुढील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा. **१०**

(अ) सूर्यग्रहणाच्या दिवशी एडिसनच्या डोक्यामध्ये कोणता विचार आला ?

(ब) एडिसनचे वैशिष्ट्य कोणते ?

(क) कामातून फुरसत मिळाली की एडिसन काय करायचे ?

(ड) एडिसनने टीकाकारांना कोणते उत्तर दिले ?

(इ) प्रयोग यशस्वी झाल्यानंतर एडिसनने कुठे रोषणाई केली ?

**किंवा**

'आभाळातल्या पाऊलवाटा' पाठाच्या आधारे पुढील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा.

(अ) पक्ष्यांच्या दुनियेतल्या आश्चर्यकारक गोष्ट कोणत्या ?

(ब) पक्ष्यांच्या स्थलांतराविषयी प्राचीन वाङ्मयात कोणते संदर्भ आढळतात ?

(क) पक्ष्यांच्या पायामध्ये वाळे का अडकवले जातात ?

(ड) पक्ष्यांच्या स्थलांतराच्या मागची मूळची प्रेरणा कोणती ?

(इ) पक्ष्यांचा स्थलांतराचा संबंध आता कशाशी निगडीत आहे ?

**प्रश्न क्र.५** 'संतकृपा झाली' व 'व्यायामाचे महत्त्व' या कवितांच्या आधारे पुढील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा.

(अ) 'संताचे कार्य नेहमीच मार्गदर्शक ठरते' हे संतकृपा झाली अभंगातून कसे सांगितले आहे ? **५**

(ब) व्यायामाचे मानवी जीवनातील महत्त्व सांगा. **५**

**किंवा**

'भेटीलागी जिवा' व 'पुन्हा एकदा' या कवितांच्या आधारे पुढील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा.

(अ) संत तुकारामांनी पांडुरंगाच्या भेटीबाबत दिलेल्या दृष्टांन्तातील तुम्हांला आवडलेला दृष्टान्त स्पष्ट करा.

(ब) नवनिर्माणाचा ध्यास घेतलेल्या मनाच्या भावस्थितीचे वर्णन पुन्हा एकदा या कवितेत कसे केले आहे ?

गुण

**प्रश्न क्र.६** **(अ)** पुढीलपैकी कोणत्याही **पाच** इंग्रजी शब्दांचे मराठी पर्याय लिहा. ५

(१) Suitable (२) Production (३) illiterate
(४) The Parliament (५) Decision (६) Steno-typist

**(ब)** पुढील इंग्रजी प्रश्नांची उत्तरे मराठीत पूर्ण वाक्यात लिहा. ५

(१) Who is your favourite player in cricket ?
(२) Which subject do you like the most ?
(३) Who is your favourite national Hero ?
(४) What is your proudest moment ?
(५) What's most important to you in life ?

**(क)** पुढील अंक अक्षरात लिहा. ५

(१) १५ − ६ = ९
(२) १८ + १२ = ३०
(३) २८ ÷ ७ = ४
(४) ४२%
(५) ८ × ४ = ३२

(ड) पुढीलपैकी पाच शब्दांचा अर्थपूर्ण वाक्यात उपयोग करा. ५

(१) इंद्रधनुष्य
(२) जीवन
(३) आवाज
(४) निसर्ग
(५) कष्ट
(६) आनंद

**प्रश्न क्र.७** **(अ)** पुढील शब्दांचे लिंग बदला ३

(१) मित्र
(२) आजोबा
(३) गायक

गुण

**(ब)** पुढील शब्दांचे वचन बदला ३

(१) महिना

(२) पालखी

(३) खुर्ची

**(क)** पुढील वाक्यांपुढे दिलेल्या क्रियापदांची योग्य रूपे वापरून वाक्ये पुन्हा लिहा. (कोणतेही **चार**) ४

(१) वातावरण अतिशय प्रसन्न (होणे)

(२) कलासक्त आणि निळ्या पाण्यावर तरंगणारे शहर सोडताना मनाला खूपच हुरहूर (वाटणे)

(३) वर्तमानपत्रातून दिव्याच्या शोधाची बातमी जगभर (पसरणे)

(४) नाटक सकाळी पाच वाजता (आटोपणे)

(५) अन्नाचे दुर्भिक्ष हीच स्थलांतरामागची मूळ प्रेरणा (असणे)

*-*-*-*-*-*-*-*

**एतदर्थ मंडळ ( मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन**

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,

डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

**अराजपत्रित कर्मचाऱ्यांसाठी मराठी भाषा निम्नस्तर परीक्षा**

**प्रश्नपत्रिका दोन — सुसंगत लेखन व अनुवाद**

दिनांक ३० डिसेंबर, २०१८

[ वेळ : दुपारी १.४५ ते सायंकाळी ४.३० ]

**( तोंडी परीक्षेस लागणारा वेळ धरून)**

**(एकूण गुण : १००)**

---

सूचना :- (१) नवीन प्रश्न नवीन पानावर सोडवावा.

(२) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.

(३) प्रश्नासमोर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा पूर्ण गुण दिले जाणार नाहीत.

(४) प्रश्नपत्रिकेवर कोणत्याही प्रकारचे लेखन करण्यात येऊ नये.

**गुण**

प्रश्न क्र. १. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे २० ओळींचा निबंध लिहा. २०

(अ) माझं गाव, माझी माणसं

(ब) महिला सबलीकरण : वास्तव व व्यथा

प्रश्न क्र. २. खालीलपैकी कोणत्याही एका विषयाच्या संदर्भात सुमारे १५ ते २० ओळींत तुमचे विचार लिहा. २०

(अ) नोकरी की व्यवसाय ?

(ब) महागाईचा भस्मासूर शांत होणार ?

प्रश्न क्र. ३. खालीलपैकी कोणत्याही २ बाबी तयार करा. ३०

(अ) सतत कामावर उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्याला समज देणारे सूचनापत्र काढा.

(ब) पूर व अतिवृष्टी संदर्भात रात्रपाळी कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यासाठी आदेश तयार करा.

(क) पालिका शाळांमधील विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासासाठी केलेल्या उपाययोजनांची माहिती देणारे पत्रक लिहा.

**कृ.मा.प.**

प्रश्न क्र. ४. (अ) खालीलपैकी कोणत्याही दहा शब्दांचे मराठी पर्याय लिहा. १०

(१) Unforeseen
(२) A self-contained proposal
(३) A religious ceremony
(४) Secular
(५) Misconduct
(६) A discrepancy
(७) Concurrence
(८) Methodical
(९) Subjective
(१०) Co-education
(११) Copyright

(ब) खालीलपैकी कोणत्याही पाच वाक्यांचे मराठीत भाषांतर करा. १०

(१) There shall be High Court for each state.
(२) The Council of Ministers shall be collectively responsible to the Legislative Assembly.
(३) "District" means a district in a state.
(४) The manner of election of the chairperson of a Municipality.
(५) Of negligence in the performance of its duties.
(६) "State Act" means any law made by the legislature of a state.

प्रश्न क्र. ५. खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा. १०

Consumed in the construction, maintenance or operation of any railway by the Government of India or a railway company operating that railway, or sold to that Government or any such railway company for consumption in the construction, maintenance or operation of any railway, and any such law imposing, or authorizing the imposition of, a tax on the sale of electricity shall secure that the price of electricity sold to the Government of India for consumption by that Government, or to any such railway company as aforesaid for consumption in the construction, maintenance or operation of any railway, shall be less by the amount of the tax than the price charged to other consumers of a substantial quantity of electricity.

-----------------------